७०३

- मंगळ वाचन मंदिर -

संगीत अमृत

२०८

भरत नाट्य संशोधन मंदिर
सदाशिव पेठ, पुणे ३०.

# १

जयंता फडणीस आणि त्याची आई राहात असलेला छोटासा ‘फ्लॅट’. बाहेरच्या हॉलमध्यें टापटिपीचें फर्निचर, एक ग्रामोफोन, पुस्तकांचें ‘शेल्फ’, दोन-चार सुंदर तसबिरी, मध्यभागीं जयंताच्या वडिलांचें एक ‘एन्लार्जमेंट’ दिसत असून, प्रेक्षकांच्या उजव्या बाजूला एक लहानशी बाल्कनी, त्यानंतर बाहेरून येण्याचा दरवाजा व त्याच्या पलिकडे एक खिडकी आहे. समोर डाव्या बाजूस आंतल्या खोलींत जाण्याचा दरवाजा आहे.

संध्याकाळचे साडेसहा वाजून गेले आहेत. जयंताची आई खिडकींत उभी राहून व मधून मधून बाहेरच्या दरवाज्यांतून बाहेर फेऱ्या मारीत त्याच्या येण्याची वाट पाहात आहे.

जयंताचा मित्र रघुनाथ ‘पेशन्स’चा डाव मांडून एका आराम-खुर्चीवर बसला आहे. ग्रामोफोनवर एक रेकॉर्ड वाजते आहे, व रघुनाथ खेळतां खेळतां शीळ वाजवीत त्या गाण्याला साथ करीत आहे. मधून मधून जयंताच्या आईची अस्वस्थता पाहून तो स्वतःशींच हंसत आहे.

रेकॉर्ड संपते आणि रघुनाथ ती बदलण्यासाठीं उठतो.

ई : अजून आला नाहीं जयंता. किती वाजले रे रघू?

ुनाथ : *(हातांतलें घड्याळ पाहून)* साडेसहा वाजून साडेतीन मिनिटं ठीं.

ई : म्हणजे आतां थोड्या वेळानं सात वाजतील. आणि अजून हा आला हीं?

**रघुनाथ** : ठीक आहे. आतां आला घरीं म्हणजे विचारतों त्याला.—ही माझी 'रमी' झाली.

**आई** : असलं कांहीं तरी भरवूं नकोस बाबा त्याच्या डोक्यांत.

**रघुनाथ** : अग, पण त्याच्या लग्नाच्या तयारीला लागायलाच हवं तुला आ ही पंचविशी मोठी वाईट असते. तूं कांहीं धडपड केली नाहींस, तर तोच तरी धडपडायचा !

**आई** : माझा जयंता असा इतर मुलांसारखा नाहीं रघू. तो बोलला ना तरी त्याच्या मनांतलं सारं कांहीं कळतं मला.

**रघुनाथ** : मग त्याला आज महिनाभर घरीं यायला उशीर कां होतो, ओळख बघूं.

**आई** : अरे, कुठं ऑफिसांत जास्त काम असतं, नाहींतर 'बस'ची पाहात राहावं लागतं.

**रघुनाथ** : या महिन्यांतच 'बसिस्' मध्यें गर्दी व्हायला लागली वाटतं अग मावशी, या वयांतच ऑफिसांत जास्त काम निघतं—'बसिस्' वेळेवर नाहींत—मित्र घरीं चहाला बोलावतात—

**आई** : म्हणजे तूं म्हणतोस तरी काय ? जयंता मला खोटं सांगून फसवतो ?

**रघुनाथ** : छेः छेः, आपला माझा अनुभव सांगितला तुला. पटला तर पा

**आई** : नाहींच पटायचा. जयंता माझा आहे आणि तो माझाच राहाणार.

**रघुनाथ** : अग, मी कुठं नाहीं म्हणतों ? पण आईला आपलं मूल कितीही ज कीं प्राण वाटलं, तरी त्या मुलाला पंख फुटले असल्यामुळं बाहेरच्या जगांत नवी नवीन नातीं येऊन चिकटतात, त्याला काय करणार ? आईला त्याच्याशिव कुणी नसतं खरं; पण त्याला बाहेरच्या जगांत मित्र भेटतात—मैत्रिणी भेटतात— त्याच्या मनाला ओढ लागणाऱ्या अनेक गोष्टी आदळतात—त्या साऱ्या झिडकार तो काय आईच्या कुशींतच जन्मभर लपून राहणार ?

**आई** : जयंता राहील. त्याला माझ्याखेरीज कुणाची माया लागणार नाहीं.

**रघुनाथ** : आज पंचविसावं वर्ष लागणार त्याला !

**आई** : मग काय झालं ? चोव्वीस वर्षं नाहीं तो माझ्या कुशींत राहिला ?



**नाथ** : आणि गेला महिनाभर उशिरां घरीं यायला लागला आहे तो !

**ई** : मग—येईना. पण बाहेर त्याचा जीव राहात नसेल.

**नाथ** : विचारायला हवं त्याला आल्यावर, कीं आतां तुला बाहेर जास्त मतं कीं घरीं ?—पण मावशी, तूं काय वाटेल तें करून आतां त्याचं लग्न न टाक. त्याशिवाय कांहीं तो घरीं लवकर यायचा नाहीं ऑफिसांतून. मला घां-तिघांनीं विचारलं आहे जयंतासाठीं.

**ई** : अरे, इथं देखील तिघं-चौघं आले होते विचारायला. पण सगळ्यांना हीं म्हटलं मीं.

**नाथ** : म्हणजे जयंताला जन्मभर लग्नाशिवायच ठेवणार आहेस कीं काय तूं ?

**ई** : असं कसं करीन मी ? पण मी जितकी त्याच्यावर माया करतें, तितकी रून आलेली कुठली मुलगी करणार आहे का ? मग कशाला हवं तें लग्न ?

**नाथ** : अग, तूं त्याच्यावर माया खूप करतेस—म्हणून काय आणखी त्याला हीं नको असेल ? मला परवां म्हणत होता—

**ई** : काय ?

**नाथ** : कीं आई आपल्या लग्नाची अजून गोष्टच काढीत नाहीं.

**ई** : असं म्हणाला तो ?

**नाथ** : म्हणजे आज पंचविसावं वर्ष लागलं ना त्याला! असले विचार चेच त्याच्या डोक्यांत. विसाव्या वर्षी प्रेमाचे, पंचविसाव्या वर्षी लग्नाचे आणि ळिसाव्या वर्षी संन्यासाचे विचार माणसाच्या मनांत यायचेच !

**ई** : आला म्हणजे विचारायला हवं त्याला.

**नाथ** : अग, तुला कसं तो सांगेल ?

**ई** : तुला नाहीं का सांगितलं ?

**नाथ** : मी जानीदोस्त आहें त्याचा—तूं आई आहेस. तुला कुठल्या ष्टीनं बरं वाटेल आणि कुठल्या गोष्टीनं वाईट वाटेल, हें माहित आहे त्याला. न्याला बायकोकडे आणि मुलाला आईबापाकडे अशा नाटकीपणानं वागावंच गतं. या लपंडावामुळें तर संसार चालतात !